# बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट

दिनांक २३/०९/२०२६

---

बृहन्मुंबईत दिनांक २५/०९/२०२६ रोजी अनंत चतुर्दशी गणपती विसर्जनानिमित्त बृहन्मुंबईमध्ये मिरवणूका काढण्यात येणार आहेत. गणेशोत्सव विसर्जनाचे दिवशी मोठया प्रमाणात भाविक विसर्जन मिरवणूकांमध्ये सहभागी होतात.

दिनांक २५/०९/२०२६ रोजी अनंत चतुर्दशी गणपती विसर्जनानिमित्त मिरवणूकांकरीता बृहन्मुंबई शहरात कायदा व सुव्यवस्था राखणेकामी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या मार्गदर्शनानुसार मा. पोलीस सह आयुक्त (का.व सु.), बृहन्मुंबई ह्यांचे देखरेखीखाली बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे मा. पोलीस सह आयुक्त, वाहतुक, बृहन्मुंबई यांचे देखरेखीखाली वाहतुक नियमनाकरीता बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे.

नागरिकांना गणपती विसर्जन सुरक्षितपणे व निर्विघ्नपणे साजरा करता यावे याकरीता मुंबई पोलीस दलाकडून वाहतुक विभागासह किमान **०६ पोलीस सह आयुक्त, ०९ अपर पोलीस आयुक्त, ३८ पोलीस उप आयुक्त, ६६ सहायक पोलीस आयुक्त यांच्यासह ३२१३ पोलीस अधिकारी व १८९४० पोलीस अंमलदार, १०५० पोलीस प्रशिक्षणार्थी** बंदोबस्तकामी तैनात करण्यात आलेले आहेत. त्यांचेसोबत महत्वाच्या ठिकाणी आरएएफ प्लाटुन, एस.आर.पी.एफ. प्लाटून, फोर्सवन पथक, जलद प्रतिसाद पथक (क्युआरटी), का.व सु. प्लाटुन, दंगल नियंत्रण पथक, डेल्टा, कॉम्बॅक्ट, ॲन्टी ड्रोन पथक तसेच होमगार्डस् अशा चोख पोलीस बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आलेले आहे.

तरी, बृहन्मुंबई पोलीस दलातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, गणेशोत्सव विसर्जन मिरवणूकांदरम्यान गर्दीच्या ठिकाणी संयम दाखवून पोलीसांना सहकार्य करावे, बेवारस वस्तू आढळल्यास पोलीसांना त्याबाबत तात्काळ माहिती दयावी. नागरीकांनी तात्काळ पोलीस मदतीसाठी पोलीस हेल्पलाईन १००/११२ येथे संपर्क साधावा.

****

Scanned with CamScanner